**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक १५/२०२०** **दिनांक २०/०२/२०२०** **कालावधी ५ दिवस**

**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १४/०२/२०२० ते २०/०२/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २१/०२/२०१९ सकाळी ८:३० पासून २५/०२/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४/०२ | १५/०२ | १६/०२ | १७/०२ | १८/०२ | १९/०२ | २०/०२ | | २१/०२ | २२/०२ | २३/०२ | २४/०२ | २५/०२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३४.० | ३४.२ | ३४.० | ३४.० | ३६.२ | ३५.५ | ३४.६ | कमाल तापमान (अं.से) | ३६ | ३५ | ३६ | ३६ | ३७ |
| १६.५ | १५.५ | १४.७ | १५.८ | १६.५ | १५.७ | १५.४ | किमान तापमान (अं.से) | २२ | २२ | २१ | २१ | २२ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | मेघाच्छादन (ऑक्टा) | २ | १ | ० | ० | ० |
| ९२ | ९१ | ९१ | ९० | ९४ | ८८ | ९२ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ६८ | ६६ | ६३ | ६२ | ६२ |
| ५१ | ४४ | ४० | ४३ | ४१ | ४३ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | २८ | २७ | २५ | २४ | २३ |
| ३.२ | ३.२ | ३.४ | २.७ | २.७ | ३.० | २.८ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ५ | ६ | ७ | ५ | ४ |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | वाऱ्याची दिशा | ई. | ई. | ई. | ई.पू. | पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ५१३०.९ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक २१ ते २५ फेब्रुवारी २०२० दरम्यान कमाल व किमान तापमानात वाढ संभवत असून आकाश निरभ्र राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भुईमुग** | **आऱ्या अवस्था** | • कमी होणारी आर्द्रता व वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनामध्ये वाढ संभवत असल्याने भुईमुग पिकास पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **वाल** | **दाणे अवस्था** | • कमी होणारी आर्द्रता व वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनामध्ये वाढ संभवत असल्याने दाणे भरण्याच्या अवस्थेत असलेल्या वाल पिकास पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **आंबा** | **फळधारणा** | • फळधारणा झालेल्या आंबा बागेमध्ये वाटाणा आकाराच्या अवस्थेत तुडतुड्याचा, फुलकिडीचा आणि भुरी रोगाचा प्रादुर्भाव आढळून येण्याची शक्यता असल्यामुळे मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार चौथी फवारणी (तिसऱ्या फवारणीनंतर १५ दिवसांच्या अंतराने) थायमेथाक्झाम २५ टक्के डब्ल्यु. जी. १ ग्रॅम + भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.<br>• फळधारणा झालेल्या आंबा बागेमध्ये मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार पाचवी फवारणी (चौथ्या फवारणीनंतर १५ दिवसांच्या अंतराने) तुडतुड्याचा, फुलकिडीचा आणि भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मि.ली किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. + भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी हेक्झाकोनॅझोल ५ टक्के ५ मि.ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• आर्द्रतेत घट व तापमानात वाढ संभवत असल्याने फळधारणा झालेल्या आंबा बागेमध्ये, फळगळ कमी करण्यासाठी, पाण्याच्या उपलब्धतेनुसार १५० ते २०० लिटर पाणी प्रती झाडास या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने ३ ते ४ पाण्याच्या पाळ्या दयाव्यात तसेच झाडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन करावे.<br>• उत्पादन व फळांची प्रत सुधारण्यासाठी १ टक्के पोटॅशियम नायट्रेटची फवारणी फळे वाटाणा, गोटी व अंडाकृती अवस्थेत असताना करावी.<br>• फळे गोटी ते अंडाकृती आकाराची असताना डॉ.बा.सा.कों.कृ.विद्यापीठाने दिलेल्या शिफारशी नुसार फळगळ कमी करण्यासाठी, फळाचा आकार व वजन वाढून डाग विरहीत फळांसाठी, फळामधील साक्याचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि फळमाशीपासून संरक्षण करण्यासाठी २५ x २० सें.मी. आकाराची कागदी पिशवी लावावी.<br>• आर्द्रतेत घट व तापमानात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच झाडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन करावे. |
| **काजू** | **फळधारणा अवस्था** | • आर्द्रतेत घट व तापमानात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या काजू कलमांना पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच झाडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन करावे. |
| **नारळ** | **-** | • आर्द्रतेत घट व तापमानात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या नारळ बागेस पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे.<br>• नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांची कडक उन्हामुळे पाने करपू नयेत म्हणून रोपांना वरून सावली करावी.<br>• पाच वर्षावरील नारळाच्या प्रति झाडास ७५० ग्रॅम युरिया व ६६७ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश असा खताचा तिसरा हप्ता देण्यात यावा. खते नारळाभोवती १.५ ते १.८ मीटर अंतरावर मातीत मिसळून दयावीत व खते दिल्यानंतर माडास पाणी दयावे. |
| **सुपारी** | **-** | • आर्द्रतेत घट व तापमानात वाढ संभवत असल्याने सुपारी बागेस पाणी देण्याची व्यवस्था करावी. |

| | | |
|---|---|---|
| **फळबाग रोपवाटिका** | **वाढीची अवस्था** | • आर्द्रतेत घट व तापमानात वाढ संभवत असल्याने फळबाग रोपवाटिकेस पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• फळबाग रोपवाटिकेतील गवत काढून स्वच्छता ठेवावी व गरजेनुसार रोपांसाठी सावली करावी. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या/** | - | • जनावरांच्या शरीराचे तापमान संतुलित राहण्यासाठी जनावरांना ताजे स्वच्छ व थंड पाणी मुबलक प्रमाणात देण्यात यावे.<br>• उष्णतेपासून जनावरांचे संरक्षण करण्याकरिता दुपारच्या वेळी जनावरांच्या अंगावर थंड पाणी शिंपडावे त्यामुळे शरीराचे तापमान कमी होण्यास मदत होईल. |
| **कुकुटपालन** | - | • दिवसाच्या कमाल तापमानात वाढ संभवत असल्याने कोंबड्यांचे उष्णतेपासून संरक्षण करावे.<br>• कुकुटपालन शेड मध्ये पाण्याची भांडी वाढवावी व पिण्यासाठी स्वच्छ आणि थंड पाण्याची मुबलक प्रमाणात देण्यात यावे. तसेच खाद्य सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळेस देण्यात यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**